विशेष लेख क्र.२६१

२१ भाद्रपद १९२८ शके (सायं.५.३० वा.)
मंगळवार, दि. १२ सप्टेंबर २००६

# पर्यटकांना आनंददायी प्रवास देणारी डेक्कन ओडिसी

***पंचतारांकीत हॉटेल्सप्रमाणे आता पंचतारांकीत रेल्वे रुळावर धावत आहेत. डेक्कन ओडिसी नांवाची रेल्वे ही महाराष्ट्रात तसेच गोव्यापर्यंत वेगाने धावत आहे. ही रेल्वे कशी आहे, याची माहिती देणारा हा लेख...***

महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांना पंचतारांकीत संस्कृतीचे कोंदण मिळवून देणारी बहुप्रतिक्षित अशी डेक्कन ओडिसी रेल्वे आहे. पर्यटनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि रेल्वे मंत्रालयातर्फे ही डेक्कन ओडिसी रेल्वे सुरु करण्यात आली आहे. या पंचतारांकीत रेल्वेगाडीमुळे राज्याच्या पर्यटनाला चालना मिळणार आहे, निसर्गरम्य महाराष्ट्र गोव्याचे देशी विदेशी पर्यटकांना अनोखे दर्शन होणार आहे. दक्षिण आफ्रिकेची सफारी घडवून आणणारी ब्ल्यू ट्रेन, युरोपची सहल घडवून आणणारी ओरिएंट एक्सप्रेस तर राजस्थानचे दर्शन घडविणारी 'पॅलेस ऑन व्हील' याच धर्तीवर महाराष्ट्रात प्रथमच अशा प्रकारची अलिशान पर्यटन रेल्वे सुरू करण्यात आलेली आहे. या वातानुकूलीत रेल्वेत मावळयांच्या पेहरावातील कर्मचारी प्रवाशांचे लक्ष वेधून घेतात. या गाडीतील अंतर्गत सजावट डोळ्याचे पारणे फेडणारी असून तिला श्रीमंतीचे तेज आहे. चमकदार निळ्या रंगाची सुरेख सोनेरी किनार असलेली डेक्कन ओडिसी रेल्वेगाडी गोव्यासह आता मराठी मुलखात धावत आहे. पंचतारांकीत सोयी-सुविधांनी सज्ज अशी ही **२१** डब्यांची गाडी आहे. पर्यटकांना डेक्कन ओडिसीमुळे आता महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जवळून चांगले दर्शन होणार आहे. ऐतिहासिक, सांस्कृतिक व नैसर्गिक महाराष्ट्राची नयनरम्य सफर डेक्कन ओडिसीमुळे पर्यटकांना होणार आहे. डेक्कन ओडिसी या आरामदायी गाडीतून प्रवास करणा-या प्रवाशांना अत्याधुनिक सोयीसुविधा बरोबरच विमा संरक्षणही आता मिळणार आहे. या **२१** डब्याच्या गाडीत सर्व प्रकारच्या पंचतारांकीत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. केबल टीव्ही पासून इंटरनेटपर्यंत आणि कॉन्फरन्स रुमपर्यंतच्या सुविधा या रेल्वेत आहेत. मुंबईहून निघणारी ही गाडी कोकणच्या निसर्गरम्य परिसराचा फेरफटका मारुन पुणे, औरंगाबाद आणि नाशिक, कोल्हापूर येथील स्थळांचे दर्शन घेऊन पुन्हा मुंबईला परत येते.

डेक्कन ओडिसी सुरु करण्यामागे नफा कमावण्याचा उद्देश नसून जगाच्या पर्यटन नकाशावर महाराष्ट्रालाही स्थान मिळवून देण्याचा हेतू असून डेक्कन ओडिसी ही महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्राची एक ब्रँड ॲम्बेसेडर आहे.

डेक्कन ओडिसीची प्रवासाची सुरुवात मुंबईच्या छत्रपती शिवाजी टर्मिनस येथून होते. गणपतीपुळे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, तारकर्ली, सावंतवाडी, गोवा, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, अजिंठा, वेरुळ आणि नाशिक असा प्रवास या गाडीचा आहे.

पारंपरिक संगीत आणि नृत्य प्रकाराचे कोकणातील पारंपरिक नमन खेळे व जाखडी हया नृत्यप्रकाराची माहिती विदेशी पर्यटकांना डेक्कन ओडिसीमुळे होणार आहे.

प्रत्येक डब्यात कंपार्टमेंट आहे. एखाद्या पंचतारांकित हॉटेलची प्रत्येक खोली वाटावी असे हे

...२/-

कंपार्टमेंट आहे. सॅटेलाईट, दूरध्वनी, डीव्हीडी-व्हीसीडी, गालीचे, सोफे आणि अन्य पंचतारांकीत सुविधाही येथे आहेत. या रेल्वेमध्ये ब्युटी सलुन, हेल्थ स्पा आणि जिम आहे. भव्य असा बार आणि कॉन्टिनेंटल फुड सर्व्हे करणारे रेस्टॉरंट आहे. अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे कॉन्फरन्सिंग सेंटरही आहे. आरक्षण करण्यासाठी आता ऑन लाईन सुविधा पण करण्यात आलेल्या आहेत. रेल्वेच्या डब्यांना नळदुर्ग, गावीलगड, दौलताबाद, विजयदुर्ग, मुरुड,जंजिरा रायगड, सिंधुदुर्ग अशी नांवे दिलेली आहेत. डब्यामध्ये "सवाई माधवराव पेशवे" यांचा दरबार, पेशवे थोरले बाजीराव, मस्तानी आदींची सुंदर छायाचित्रे लावली आहेत. महाराष्ट्रातील कलाकुसरीचे दर्शन या ठिकाणी होते. सदर रेल्वेमध्ये कंपनीस जर त्यांच्या विषयाचे चर्चासत्र घ्यावयाचे असेल तर त्यासाठी कान्फरन्स हॉल उपलब्ध आहे. अशा या आंतरराष्ट्रीय क्षेत्रावर असलेला पर्यटनाचा हा एकमेव प्रकल्प महाराष्ट्रात राबविण्यात येत असून जेणेकरुन महाराष्ट्र राज्याचे नांव जगाच्या नकाशावर येण्यास फार मोठा हातभार लागणार आहे. जागतिक पातळीवर मोठया प्रमाणावर पर्यटन हे महाराष्ट्रात रुजू झाले. तर मोठया प्रमाणाच्या रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. परकीय चलनही याद्वारे मिळणार आहे. महाराष्ट्रात आज आंतरराष्ट्रीय स्तरावर डेक्कन ओडिसीचा गौरव होत आहे, ही प्रत्येक महाराष्ट्रीयन व्यक्तिस अभिमानाची गोष्ट आहे. या डेक्कन ओडिसीत सहभागी होण्यासाठी जागतिक पातळीवर पर्यटन करण्यात येत आहे.

या डेक्कन ओडिसीचे मुख्य प्रकल्प अधिकारी विजय चव्हाण आहेत. महाराष्ट्र राज्याचे पर्यटन मंत्री विजयसिंह मोहिते पाटील, पर्यटन राज्यमंत्री सुरेश शेट्टी, पर्यटन प्रधान सचिव आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक भूषण गगराणी यांच्या प्रयत्नाने हा पंचतारांकित महल पर्यटकांना प्रवासासाठी खुला झाला आहे.

- श्रीपाद नांदेडकर
वरिष्ठ सहाय्यक संचालक, मुंबई

---------